# रत्नागिरी पोलीसांची उद्दीष्टे

पोलीसांचे प्रमुख् कर्तव्य् म्हणजे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, गुन्हेगारांचा शोध घेणे, गुन्हे प्रतिबंध करणे, अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करणे, नागरिकांना भयमुक्त् वातावरण निर्माण करणे, असे असते. त्याचबरोबर रत्नागिरी जिल्हयास लाभलेला अथांग 243 कि.मी. चा सागरी किनाऱ्यावर बारकाईने लक्ष ठेवणे सागरी सुरक्षा व दहशदवाद प्रतिबंधक उपाययोजना आखणी व त्याची कौशल्याने अंमलबजावणी करणे आहे. या सर्व गोष्टी करत असतानाच दाखल गुन्हयातील आरोपींविरुद्ध सबळ पुरावे संकलीत करुन त्यांना शिक्षा होईल या हेतुने कार्यवाही करणे.

पोलीसांच्या दैनंदिन कामकाजामध्ये पारदर्शकता यावी याकरीता पारंपारीक कार्यपद्धतीमध्ये बदल करुन नवीन क्रियारीती अमलात आणणे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, महामार्गावरील रहदारीचे नियोजनबद्ध व कौशल्याने नियमन करुन अपघातातील मृत्युंचे प्रमाण कमी करणे, महिलांना भयमुक्त वातावरणात संचार करता येईल अशा पद्धतीने गुन्हेगारावर कठोर व कायदेशीर कारवाई करणे. पोलीस ठाण्यात भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस पोलीसांकडून चांगली वागणुक दिली जाईल तसेच तक्रारदारासाठी पिण्याचे पाणी व आसनव्यवस्था चांगल्याप्रकारे कशी देता येईल याबाबत अभ्यासपुर्ण निरीक्षण करुन त्याकरीता प्रयत्नशील रहाणे.

जनतेचे रक्षणकर्ते पोलीस यांचे आरोग्य सुधारणा कार्यक्रम, कर्तव्य् चांगल्या पद्धतीने पार पाडता यावे याकरीता व्यक्तीमत्व विकास करणे कार्यक्रम राबविणे व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.

डॉ. संजय शिंदे
पोलीस अधीक्षक, रत्नागिरी